सकाळ
पुणे, बुधवार,
१५ जून २०१६
५

# स. प.तील आठवणींना उजाळा

## सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी जागवल्या स्मृती

**पुणे, ता. १४ :** "झटको न यूँ जुल्फे, ये मोती तूट जाएंगे.. तुम्हारा कुछ ना बिघडेगा, लेकीन हम..." हॉस्टेलमध्ये राहताना महाविद्यालयाच्या जलतरण तलावाकाठी बसून केलेल्या अशा चारोळ्या... रंगमंचावर सादर केलेली 'संगीत शारदा', 'एकच प्याला' अशी नाटके यांसह महाविद्यालयीन जीवनातील अनेक आठवणी सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी मंगळवारी जागवल्या.

स. प. महाविद्यालयाच्या शताब्दीपूर्ती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पाटील बोलत होते. या प्रसंगी संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ उपस्थित होते. संस्थेला जागा देणाऱ्या जगन्नाथ महाराज पंडित यांचे कुटुंबीय मालती पंडित, सिद्धराज पंडित, श्रीराम पंडित, जयदीप मोघे, सुवर्णा शिरोडकर; तसेच ही जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे लोकमान्य टिळक यांचे कुटुंबीय दीपक टिळक व मुक्ता टिळक यांचा स्मृतिचिन्ह देऊन पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दरम्यान, माजी विद्यार्थी संघटनेतर्फे मानपत्र देऊन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. मराठीतून लिहिलेले हे मानपत्र सिक्कीम राजभवनात भिंतीवर अभिमानाने लावण्याचे आश्वासन पाटील यांनी या वेळी दिले.

पाटील म्हणाले, "या महाविद्यालयात रंगमंचावर बागडलो, नाचायला मिळाले. जे आवडते ते मला दिले आहे, पण आज कितीही मिळाले तरी आनंद नाही मिळत."

"सिक्कीम राज्यात मुलींना प्रचंड मान दिला जातो. एकटी मुलगी घाटातून गुणगुणत जाऊ शकते. तिथे कोणीही उगाच 'हॉर्न' वाजवत नाही, ओव्हरटेक करत नाही. प्लॅस्टिक टाकत नाही किंवा पिचकारीही उडवत नाही. हे सगळं काही पूर्वी पुण्यातही होते, पण आता नाही. हे उजाडलेले माळरान पुन्हा फुलवूया" असे आवाहनही पाटील यांनी केले.

ॲड. जैन म्हणाले, "स. प. महाविद्यालयाने नुकतेच अकरावीसाठीच्या व्यवस्थापनाकरिता असलेल्या राखीव जागा (कोटा) सरकारकडे परत केल्या आणि आता प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः 'मेरिट'च्या आधारावरच घेण्यात येणार आहेत."



**टिळक रस्ता :** सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या शताब्दीपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलनाने करताना श्रीनिवास पाटील. या प्रसंगी प्राचार्य डॉ. दिलीप शेठ, ॲड. एस. के. जैन.

### संस्थेचे 'व्हिजन डॉक्युमेंट'

- कागदरहित (पेपरलेस) कार्यालय
- 'एसपीइन्फो' मोबाईल ॲप तयार करणार
- गुगल क्लासरूम सुरू करणार
- 'ट्रान्स्फॉर्मेशनल लीडरशिप' विकास कार्यक्रम राबविणार
- 'केपीओ' निर्माण करणार
- 'बिझनेस इन्क्युबेशन सेंटर' स्थापन करणार
- सौरऊर्जेचे पॅनेल बसवून 'ग्रीड'ला जोडणार